29/57. ४५

# परिशिष्ठ क्रमांक १७

## तोलणार / मापणार / वखारवाला / मदतनीस / हमाल / किंवा ............ ची अनुज्ञप्ती मिळणेकरिता अर्ज कलेल्या इसमाने करून देण्याचा करारनाम्याचा नमुना

मा.सभापती,
कृषि उत्पन्न बाजार समिती, ----------------------------------

करारनामा करून देणार मी / आम्ही

नांव ---------------------------------------------------------------------------------- वय ----------

व्यवसायाचा पत्ता -------------------------------------- राहणार ---------------------------------------------------

**आपल्याशी आज रोजी करारनामा करून देतो की,**

१) महाराष्ट्र शेतीच्या उत्पन्नाची खरेदी-विक्री (नियम) अधिनियम, १९६३ त्याखालील नियम, उपविधी व त्याखालील उपनियम मी / आम्ही संपूर्णपणे वाचले असून ते मला / आम्हास पूर्णपणे समजले आहेत व त्याप्रमाणे व त्यात पुढे वेळोवेळी होणाऱ्या दुरूस्त्याप्रमाणे तसेच बाजार समितीचे झालेले व पुढे होणार ठराव, हुकुम याप्रमाणे मी / आम्ही वागण्याचे कबूल करतो.

२) वरील अधिनियम, नियम, उपविधी व त्याखालील उपनियम तसेच बाजार समिती वेळोवेळी फर्मावेल अशी सर्व प्रपत्रे, नोंदवह्या मी आम्ही आवश्यक ती माहित अद्यावत लिहून ठेवीन / ठेवू. तसेच बाजार समितीस हवी असलेली माहिती वेळोवेळी फर्माविण्यात येईल, अशा नमुन्यात पुरविन / पुरवू व ही कागदपत्रे योग्य ते अधिकार दिलेल्या अधिकाऱ्यास तपासणीसाठी उपलब्ध करून देईन / देऊ व तपासणीकामी मदत करीन / करू.

३) बाजार समिती देणे असलेल्या फी व अन्य रकमा देण्यात चुकवाचुकव करणाऱ्यांशी तसेच अनधिकृत इसमांशी मी/आम्ही कोणत्याही प्रकारचे व्यवहार करणार नाही व अशा इसमांविरूद्ध कायदेशीर उपाययोजना करण्यास बाजार समितीस सहकार्य करीन/करू.

४) बाजार समितीशी मी/आम्ही नेहमी सहकार्याचे धोरण ठेवीन/ठेवू. बाजार समिती वेळोवेळी फर्मावेल अशा रितीने आमचे कामकाज करीन/करू. बाजारातील कोणत्याही कामकाजात अडथळा येईल अगर चालू कामकाज बंद पडेल असे वर्तन करणार नाही. तसेच मी/आम्ही व्यवसाय करीत असलेल्या बाजाराची प्रतिष्ठा व लौकिक अधिकाधिक वाढेल अशा पद्धतीने मी/आम्ही कामकाज करीन/करू.

आमचे समक्ष सही केली -

(१) सही ----------------------------------- सही
नाव -----------------------------------
पत्ता ----------------------------------- दिनांक

(२) सही -----------------------------------
नांव -----------------------------------
पत्ता -----------------------------------